अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २१ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १७१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

बाणेगावातील घरफोडी उघडकीस; अल्पवयीन मुलाकडून एक लाखांचे दागिने जप्त

सुराज्य/सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील बाणेगाव येथे झालेली घरफोडी उघड करण्यात तालुका पोलिसांना यश आले असून एका अल्पवयीन मुलाकडून एक लाखाचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

१५ मार्च रोजी भरदिवसा बाणेगाव येथील रतन अशोक घाडगे (वय ४५) यांच्या घराच्या खिडकीचे गज उचकटून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटामधील ४ तोळे सोने व रोख रक्कम ७३ हजार रुपये असा एकूण २ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला होता. याबाबत सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरणातील फौजदार सूरज निंबाळकर व पोलीस अंमलदारांनी अज्ञात आरोपीच्या मागावर असताना त्यांना घरफोडीमधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम ही बालकाने चोरून नेल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने त्याच्या पालकासह मुलाची चौकशी केली असता त्याने सुरुवातीस उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर त्यास विश्वासात घेऊन त्याची विचारपूस केली असता त्यांने गुन्ह्याची कबुली दिली. चोरी केलेले सोन्याचे दागिने एका इसमाकडे ठेवण्यास दिले असल्याचे सांगितले. त्या इसमाच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी एक लाखांचे दोन तोळ्याचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहे. ही कारवाई पोलीस अंमलदार शशिकांत कोळेकर, सुनील कुंवर, पैगंबर नदाफ, फिरोज बारगीर, महादेव सोलकर, वैभव सूर्यवंशी व सायबरच्या धीरज काकडे यांनी केली.

सात दिवसानंतर संप संपला; सकाळी आक्रोश, संध्याकाळी जल्लोष

जुन्या पेन्शनचे तत्त्व धोरण म्हणून स्वीकारण्यास मान्यता

सुराज्य/सोलापूर

जुन्या पेन्शनसाठी सुरू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संपाच्या सातव्या दिवशी सोमवारी सकाळी अधिकारी आपापल्या दालनात येत असताना आंदोलनासाठी बसलेल्या कर्मचाऱ्यांनी सरकारच्या निषेधार्थ सुरू असलेल्या घोषणा तीव्र केल्या. जोरजोरात आक्रोश मांडण्यासाठी सुरुवात केली. इतकेच नव्हे तर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा एकेरी उल्लेखातून उध्दारही केला. याच कर्मचारी संघटनेच्या शीर्षस्थ नेत्यांची दुपारी बैठक झाली. त्या बैठकीतील सकारात्मक चर्चेचा तपशील बाहेर पडला. सरकारने जुन्या पेन्शन योजनेचे तत्त्व धोरण म्हणून स्वीकारल्याचे पत्र व्हायरल झाले आणि ज्यांनी आक्रोश केला होता; त्यांनी जल्लोष करायला सुरुवात केली. ज्यांचा उद्धार केला होता; त्यांचा उदो उदो करण्यास सुरुवात केली आणि गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेला संप अखेर संपला.

एकच मिशन जुनी पेन्शनचा नारा देत राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व शासकीय, निमशासकीय कर्मचारी संघटना समन्वय समिती तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना कृती समितीच्या नेतृत्वाखाली विविध कर्मचारी संघटनांनी गेल्या मंगळवारपासून सुरू केलेला बेमुदत संप सात दिवस चालला. शनिवारी सोलापुरात नियालेला अभूतपूर्व महामोर्चात एकीचे दर्शन घडवत सरकारचे लक्ष वेधले होते. सोमवारी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी आणि थाळीनाद आंदोलन करत सरकारच्या नावे बोंब मारली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचा एकेरी उल्लेख करत टोपण नावाने घोषणा देत सरकारचा निषेध केला. थाळीनाद आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालय दणाणून गेले होते. दरम्यान महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ यांच्या वतीने देखील २८ मार्च, पासून संपावर जाण्याबाबत राज्य शासनाला नोटीस दिलेली आहे. या संपावर तोडगा काढण्यासाठी सोमवारी मुख्य सचिव संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत राज्य शासनाने केलेल्या आवाहनाला कर्मचारी व राजपत्रित अधिकारी संघटनांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. बैठकीत संबंधित संघटनांनी संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. कर्मचाऱ्यांच्या मागणीबाबत राज्य शासन पूर्णतः सकारात्मक असून त्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त करून त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी जुन्या पेन्शन योजनेचे तत्त्व धोरण म्हणून स्वीकारण्यास मान्यता दिली.

पेढे वाटून जल्लोष : जुन्या पेन्शन योजनेचे तत्त्व धोरण म्हणून स्वीकारण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्य केल्यानंतर सोलापुरात सुरू असलेला संप सातव्या दिवशी संध्याकाळी संपवत मागे घेण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ फटाके फोडून आतषबाजी केली. पेढे वाटून गुलालाची उधळण करत जल्लोष केला. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले. मंगळवारपासून कर्मचारी कामावर परत येणार आहेत. याप्रसंगी माजी आमदार आडम मास्तर, कामगार नेते अशोक इंदापुरे, शंतनू गायकवाड यांच्यासह कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संप २०२३ मध्ये तोडग्याची बैठक २०२२ मध्ये

संपाच्या बैठकीबाबत वित्त विभागाचे उपसचिव यांनी राजपत्रित अधिकारी महासंघास पत्र देऊन बैठकीस निमंत्रण दिले होते. या पत्रावर २० मार्च २०२३ अशी तारीख आहे. मात्र बैठक २० मार्च २०२२ रोजी दुपारी दोन वाजता झाल्याचे म्हटले आहे. संप २०२३ तर बैठक २०२२ मध्ये झाल्याची घोडचूक या परिपत्रकामध्ये दिसून येत आहे.

कर्मचाऱ्यांनी विजयाची गुढी उभारली

जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत राज्यशासनाने चांगला निर्णय घेतला आहे. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे राज्यसरकारचा कारभार ठप्प झाला होता. आंदोलनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी खऱ्या अर्थाने विजयाची गुढी उभारली असल्याचे मत माजी आमदार आडम मास्तर , अशोक इंदापुरे, शंतनू गायकवाड यांनी व्यक्त केले.

मोहोळ येथे १ लाखांची घरफोडी

सोलापूर : मोटारीतून आलेल्या दोघा चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून कपाटातील रोख रक्कम आणि दागिने असा १ लाखाचा ऐवज पळवला. ही चोरी मोहोळ येथील बागवान नगरात रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

यासंदर्भात नासिर इस्माईल शेख (रा. बागवान नगर मोहोळ) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दोघा अनोळखी चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल केला. नासिर शेख हे रविवारी दुपारी १२ वाजता घराला कुलूप लावून बाहेर गेले. त्यानंतर एमएच३१- सीए-३०७६ या क्रमांकाच्या मोटारीतून आलेल्या दोघा चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडले आणि कपाटातील १० हजार रुपये रोख,१५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि लॅपटॉप असा माल चोरून नेला. तपास हवालदार खापरे करीत आहेत.

सावळेश्वर येथे दुचाकीचा अपघात; तरुण पुतण्या ठार, चुलता जखमी

सोलापूर : अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील तरुण ठार तर त्याचे चुलते गंभीर जखमी झाले. हा अपघात पुणे महामार्गावरील सावळेश्वर नजीक असलेल्या रिलायन्स पेट्रोल पंपासमोर सोमवारी दुपारच्या सुमारास घडला.

गोपाळ महादेव सावंत (वय २४ रा.वाकाव ता.माढा) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याचे चुलते ज्ञानेश्वर तुकाराम सावंत (वय ३६ रा.वाकाव) हे जखमी झाले. गोपाळ सावंत आणि ज्ञानेश्वर सावंत हे दोघे सोमवारी दुपारी मोहोळ ते सोलापूर असा दुचाकीवरून प्रवास करीत होते. सावळेश्वर येथील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ चारच्या सुमारास अनोळखी वाहनाच्या धडकेने दोघेही जखमी झाले होते. त्यांना ॲम्बुलन्समधून त्वरित सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता गोपाळ सावंत हा उपचारापूर्वी मयत झाला. मयत गोपाळ सावंत हा अविवाहित असून तो बार्शी येथील कॉलेजमध्ये शिकण्यास होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. तो चुलत्यासोबत सोलापुरात चारचाकी वाहनाची नोंदणी करण्यासाठी येत होता. आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे दोघे जवळचे नातेवाईक असल्याचे बोलले जात आहे. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीला दहा वर्षे सक्तमजुरी

सुराज्य/सोलापूर

एका अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी व १६ हजार रुपये दंडाची शिक्षा विशेष न्यायाधीश व्ही.पी.आव्हाड यांनी ठोठावली.

दीपक उर्फ बादल दिलीप पवार (वय-२५) असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे. दीपक याने फिर्यादीची मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असून देखील तिला तिच्या घरातून जबरदस्तीने दुचाकीवरून लग्न करण्याच्या उद्देशाने पळवून नेले. त्यानंतर तिला औरंगाबाद येथे नेले. लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार शारिरीक व लैंगिक अत्याचार केले. म्हणून पिडीतेच्या आईने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द फिर्याद दिली. त्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक भाबड यांनी करून आरोपीविरुध्द दोषारोपपत्र पाठविले होते. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस अंमलदार रुपनर यांनी काम पाहिले.

हे प्रकरण विशेष न्यायाधीश आव्हाड यांच्या समोर चालले. यात सरकारपक्षातर्फे एकूण ८ व बचाव पक्षातर्फे २ साक्षीदार तपासण्यात आले.या प्रकरणात पिडीता,फिर्यादी, तपास अधिकारी तसेच डॉक्टरांची साक्ष व सरकारी वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरून आरोपी दिपक पवार यास अत्याचारप्रकरणी दहा वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा व १६ हजारांचा दंड ठोठावला.तर आरोपीला मदत करणाऱ्या माणिक चव्हाण व वर्षा काळे या दोघांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. यात सरकारतर्फे ॲड.शीतल डोके यांनी तर आरोपीतर्फे ॲड. सुरेश पाटील-कुरुलकर यांनी काम पाहिले.

पावणेसहा लाखांच्या १२ दुचाकी जप्त; चोरट्यास अटक

सोलापूर : धाराशिव येथील दुचाकी चोरट्यास स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून त्याच्याकडून पावणेसहा लाखांच्या १२ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.यामध्ये शहरातील पाच ठिकाणाहून चोरीस गेलेल्या दुचाकींचा समावेश आहे.

अनिल फुलचंद काळे (वय ३%, रा. भोसले हायस्कुल जवळ, धाराशिव) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. ग्रामीण कार्यक्षेत्रात होत असलेल्या वाहन चोर्या उघडकीस आणून त्यास प्रतिबंध करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांना दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना तुळजापूर महामार्गावरील होनसळ फाटा येथे एक इसम नंबर प्लेट नसलेली चोरीची बुलेट मोटार सायकल घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पथकाने सापळा रचुन त्यास मोटार सायकलीसह पकडले. त्याने ग्रामीण, शहर, धाराशिव, लातूर तसेच विजयपुर येथे मागील २ वर्षात मोटार सायकली चोरल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडून पाच लाख ७० हजारांच्या एकुण १२ मोटार सायकली व एक मोबाईल हॅन्डसेट हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, श्रेणी फौजदार राजेश गायकवाड, पोलीस अंमलदार बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, सलीम बागवान, विजयकुमार भरले आदींनी केली.

पेट्रोलपंप चालवण्यास देतो म्हणून साठ लाखांची फसवणूक

पती पत्नीवर गुन्हा दाखल, सावळेश्वर येथील घटना

मोहोळ : पेट्रोल पंप भाडेतत्त्वावर चालविण्यास देतो असे म्हणून दोघांकडून साठ लाख रुपये घेऊन त्यांना पेट्रोल पंप चालविण्यास न देता त्यांचे पैसेही परत न देऊन त्यांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर येथील प्रियांका पेट्रोल पंपाच्या मालक पती-पत्नीवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची घटना २० मार्च रोजी घडली.

मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर येथे प्रियांका पेट्रोल पंप हा धनश्री दत्तात्रय शिंदे व दत्तात्रय शिंदे हा इंडियन ऑइल कंपनीचा पंप डीलरशिपमध्ये चालविण्यास मिळालेला आहे. आर्थिक अडचणीमुळे त्यांना चालविता येत नसल्यामुळे त्यांनी तो पंप विकणार असल्याचे प्रवीण प्रभाकर टेळे यांना सांगितले. त्यानुसार मुत्तूर व टिळे या दोघांनी तो भागीदारी चालवण्यासाठी घेण्याचे ठरले व त्या पेट्रोल पंपाच्या भागीदारीपोटी नोटरी करून दोघांनी मिळून प्रत्येकी ३० लाख रुपये देण्याचे ठरले होते. अशी एकूण ६० लाख रुपयांची रक्कम सन २०१८ व २०१९ मध्ये शिंदे दांपत्यांना देण्यात आली. मात्र ती रक्कम देऊनही त्यांनी सदरचा पेट्रोल पंप हा फिर्यादी व त्यांचे मित्र प्रवीण टेळे यांना चालविण्यास दिला नाही व त्यांच्याकडून घेतलेली ६० लाख रुपयांची रक्कम ही परत दिली नाही म्हणून स्वप्निल मुत्तूर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धनश्री शिंदे व दत्तात्रय शिंदे या पती-पत्नीवर आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आमच्या वेदना संपल्या नाहीत !

कल्याण
124-76-150

मेन बाजार
157-32-110

मार्च अखेरीस समांतर जलवाहिनीचा प्रश्न मार्गी लागणार

पोचमपाड-लक्ष्मी कंपनी आणि स्मार्टसिटी घेणार चर्चेअंती निर्णय

सोलापूर : येत्या मार्च महिना अखेरपर्यंत उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीचा प्रश्न मार्गी लागणार असल्याची शक्यता आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी दिली.

पहिला मक्तेदार पोचमपाड कन्ट्रक्शन कंपनी लवादामध्ये गेली आहे. पुणे येथे लावादाची प्रक्रिया सुरू आहे. पोचमपाड कंपनीने लवाद साठे यांच्याकडे २४ जानेवारी २०२३ रोजीच्या पत्राद्वारे यामध्ये दुसरा मक्तेदार लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (कोल्हापूर) यांना प्रतिवादी (रिस्पॉडन्ट) म्हणून मान्यता देण्यास विनंती केली आहे. आता स्मार्ट सिटी कंपनी, पहिला मक्तेदार पोचमपाड कंपनी आणि सध्याचा मक्तेदार लक्ष्मी कंपनी या तिघांमध्ये चर्चेअंती निर्णय होईल. यामुळे येत्या मार्च महिना अखेरीपर्यंत उजनी- दुहेरी जलवाहिनीचा प्रश्न मार्गी लागणार आहे, असे आयुक्त शीतल तेली - उगले यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सोलापूर ते उजनी दुहेरी जलवाहिनी कामासंदर्भात पोचमपाड कन्ट्रक्शन कंपनीने लवादाकडे लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ला प्रतिवादी करण्याची विनंती केली आहे. त्या संदर्भात कायदेशीर बाबी तपासण्या करिता अनुभवी सॉलिसिटर यांचा अभिप्राय घ्यावा तसेच तत्कालीन सीईओ ढेंगळे - पाटील यांच्यावर मंत्रालय स्तरावर शिस्तभंगाची कारवाई करावी, असे आदेश पालकमंत्री विखे-पाटील यांनी दिले होते.

कामासाठी झाले होते आंदोलन

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी चे काम अचानकपणे २४ नोव्हेंबर पासून बंद करण्याचे आदेश तत्कालीन सीईओ यांनी त्र्यंबक ढेंगळे - पाटील यांनी दिले होते. यामुळे शहरवासीयांबरोबरच विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून संताप व्यक्त करण्यात आला. विधानसभेत या संदर्भात आमदारांनी आवाज उठविला होता. माजी आ. दिलीप माने यांनी याबाबत एक दिवसीय उपोषण केले होते.

विद्युत पुरवठा सुरळीत होईपर्यंत चार दिवसाआड पाणीपुरवठा

महापालिका आयुक्तांची माहिती

सोलापूर : वादळी पावसामुळे विद्युत पुरवठा खंडित होऊन पाणीपुरवठ्यात विस्कळीतपणा आला आहे. त्यामुळे संपूर्ण सोलापूर शहराला २० मार्चपासून आता विद्युत पुरवठा सुरळीत होईपर्यंत चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी दिली.

मागील आठ दिवसात अवकाळी पाऊस, वारा आदी कारणाने नदीतून / धरणातून कच्चे पाणी उपसा क्षमतेपेक्षा कमी होत असल्याने शहरातील नागरिकांना वेळेवर पाणीपुरवठा करण्यास अडचण निर्माण होत आहे. वादळी पावसामुळे टाकळी, उजनी, सोरेगांव, पाकळी इत्यादि पंपींग स्टेशनवरील विद्युत पुरवठा खंडीत होऊन पाणी पुरवठयात विस्कळीतपणा आलेला आहे. त्यामुळे संपूर्ण शहरात पुढील दिवसात चार दिवसाआड पाणीपुरवठा करणे आवश्यक ठरणार आहे.